**नोटाबंदी पार्श्वभूमीवर पतसंस्थांच्या अनुत्पादक जिंदगीच्या वर्गीकरणाचा कालावधी शिथिल करणेबाबत...**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचे कार्यालय**
जा.क्र. सआ/लेखापरिक्षण/अनु.जिंदगी वर्गी./२९८/२०१७
दिनांक : २७/०१/२०१७

**-: परिपत्रक :-**

**संदर्भ** : १) रिझर्व्ह बँक इंडिया कडील परिपत्रक RBI/2016-17/143 dt.21/11/2016 व dt.28/12/2016
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार परिषद यांचेकडील जाक्र.मरासप/आयुक्त/ पत.एनपीए/ १/२०१७ दि.१ जानेवारी २०१७

राज्यातील सहकारी पतसंस्थांना अनुत्पादक जिंदगी वर्गीकरणाबाबत दि.१०/११/२००४ चे परिपत्रकान्वये दि.३१/३/२००५ अखेर संपणाऱ्या आर्थिक् वर्षापासुन अनुत्पादक जिंदगी निकष लागु करण्यात आलेले आहेत. भारत सरकारने दि.०८/११/२०१६ पासुन रु.१००० व ५०० च्या नोटा चलनातून बंद केल्यामुळे उदभवलेल्या आर्थिक अडचणींशी पतसंस्थांना सामना करावा लागत आहे. त्यामुळे संस्थांच्या कर्जवसुलीवर विपरीत परिणाम होत आहे. या सर्व बाबींचा विचार करुन राज्यातील पतसंस्थांसाठी अनुत्पादक जिंदगीचे वर्गिकरण निकषामध्ये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी शिथिलता देण्याची बाब या कार्यालयाचे स्तरावर विचाराधीन होती.

२/ मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार परिषद यांनी देखील नोटाबंदीच्या पार्श्वभूमीवर चलन तुटवड्यामुळे पतसंस्थांना अनुत्पादक जिंदगीच्या वर्गीकरणाची मुदत शिथिल करणेबाबत विनंती केलेली आहे. संदर्भ क्र.१ अन्वये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देशातील वित्तीय संस्था/बँकांना लागु असणाऱ्या अनुत्पादक जिंदगीचे वर्गीकरणास अनुसरुन ठराविक रकमेपर्यंतच्या कर्जदारांना त्यांच्या कर्ज हप्त्याची परतफेड करण्यासाठी अतिरिक्त ९० दिवसांची मुदत देऊ केलेली आहे.

३/- पतसंस्थांनादेखील आरबीआयच्या निर्देशास अनुसरुन अनुत्पादक जिंदगीच्या वर्गीकरणामध्ये शिथिलता प्रदान केल्याने अनुत्पादक कर्जाची रक्कम व त्यासाठी ढोबळ नफ्यातुन करावी लागणारी तरतुद कमी झाल्याने या पतसंस्थांच्या आर्थिक व सांपत्तीक स्थितीवर अकारण विपरीत परिणाम होणार नाही. ज्यामुळे सभासद, ठेवीदार व कर्जदार यांचे आर्थिक् हित सुरिक्षत राखले जाणार आहे.

४/- नमुद पार्श्वभूमी, आशय व निकड विचारात घेऊन राज्यातील पतसंस्थांसाठी उत्पादक जिंदगीचे (Standard Asset) अनुत्पादक जिंदगीमध्ये (Sub Standard Asset) वर्गिकरण करणेबाबत पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) रिझर्व्ह बँकेने केलेल्या नोटबंदीमुळे छोट्या कर्जदारांना कर्ज परतफेडीसाठी वाढीव कालावधीची गरज असल्याची बाब विचारात घेऊन उत्तम कर्जखात्याचे (Standard Account) अनियमित कर्ज खात्यात (Sub Standard Account) वर्गीकरण करतांना पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या एनपीए निकषानुसार ६ महिने (१८० दिवस) कालावधीमध्ये ३ महिन्यांचा (९० दिवस) अतिरिक्त कालावधी वाढविण्यात येत आहे.

तद्नुषंगाने माहे डिसेंबर २०१६ अखेर अनियमित जिंदगीमध्ये (Sub Standard Asset) वर्गीकृत होणारी अनुत्पादक कर्जखाती ही मार्च २०१७ अखेर एनपीए वर्गवारी करतांना उत्तम कर्जखाती (Standard Account) म्हणून वर्गीकृत करण्यात यावीत.

२) राज्यातील सर्व पतसंस्थांना ६ महिनेऐवजी ९ महिने सदरहु कर्ज खात्यामध्ये हप्ता भरला गेला नसल्यास ते कर्जखाते उत्तम जिंदगी या सदरामध्ये वर्गीकृत करण्यास सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापुरती शिथिलता प्रदान करण्यात येत आहे.

३) सदरचा वाढीव कालावधी हा केवळ उत्पादक जिंदगीचे (Standard Asset) अनियमित जिंदगीमध्ये (Sub Standard Asset) वर्गीकरण करण्यापुरताच लागू करण्यात येत आहे. त्यापुढील एनपीएच्या वर्गवारीसाठी कोणताही वाढीव कालावधी लागू राहणार नाही.

४) सदरहु वाढीव कालावधी केवळ रु.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी रकमेच्या मंजूर कर्जासाठी लागू करण्यात येत आहे.

राज्यातील पतसंस्थांनी अनुत्पादक जिंदगीच्या निकषांमध्ये शिथिलतेबाबत वरीलप्रमाणे अक्र.१ ते ४ अन्वयेचे निर्देशास अनुसरुन कार्यवाही करावी. पतसंस्था चळवळीमधील सभासद, ठेवीदार व कर्जदार यांचे आर्थिक् हित सुरक्षित राखणेस्तव सर्व क्षेत्रीय अधिकारी व प्राधिकृत वैधानिक लेखापरिक्षक यांनी सदरहु परिपत्रकाची अंमलबजावणी पतसंस्था पातळीवर प्रभावीपणे होईल, असे पहावे.

**(चंद्रकांत दळवी)**
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे

**प्रत पुढील उचित कार्यवाही व उपाययोजनेस्तव:**

१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन व लेखापरीक्षण) सर्व
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)
४. मा.अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद, पुणे.
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फ्रेडरेशन मर्या.मुंबई.
६. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. अपर निबंधक (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. सर्व कार्यासन अधिकारी, सहकार आयुक्त कार्यालय पुणे.
१२. श्री.एस.बी.कुलगोड, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी यांना सहकार विभागाचे संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी
१३. मा. सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, मुख्यालय, पुणे.